जा.क्र.: कक्ष-६/जमीन/ ३२३ /२०११-२०१२ (९५६)

पत्र -

वनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे
यांचे कार्यालय, सेनापती बापट मार्ग,
पुणे : ०४ दिनांक : १२/०७/२०११

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
पुणे.

**विषय :** तत्कालिन उपवनसंरक्षक, पुणे श्री. मंगरुळकर यांचे मदतीने श्रीमती मधू कपूर यांनी राखीव वनाच्या करीत असलेल्या विक्रीबाबत तक्रार.

**संदर्भ :** १) मुख्य वनसंरक्षक (संधारण) म.रा.नागपूर यांचेकडील आपले कार्यालयास लिहीलेले व प्रत या कार्यालयास पृष्ठांकित केलेली पत्र क्र.क-१२/जमीन/३/पुणे/प्र.क्र./२३/१०-११/१३०५/१०-११ दि.२८/०३/२०११. १६५

२) आपलेकडील ज्ञापन क्र. कक्ष-१/जमिन/प्र.क्र.१३०/२०७५, दि. २३.०८.२०१०

कृपया संदर्भांकित क्रमांकाचे अवलोकन होणेस विनंती.

विषयांकित विषयाच्या अनुषंगाने संदर्भांकित पत्रामध्ये उपस्थित केलेल्या मुद्याबाबत खालील प्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

मौजे पांगळोली या गावासाठी खालीलप्रमाणे वेगवेगळ्या कालावधीसाठी गावनकाशे होते.

१) सन १९१९ मध्ये अस्तित्वात असलेल्या नकाशाप्रमाणे स.नं. १ ते ६९ अस्तित्वात होते. सोबत नकाशाची छायांकित प्रत जोडली आहे. **(प्रपत्र - १)**

२) सन १९५७-५८ या वर्षी इनामी गावात मध्ये ट्रँग्युलेशन पध्दतीने सर्व्हे होऊन क्षेत्राचा कमी जास्त पत्रकानुसार आकारबंद करण्यात आला. त्याप्रमाणे स.नं. १ ते १९ अस्तित्वात आले. सोबत नकाशाची छायांकित प्रत जोडली आहे. **(प्रपत्र — २)**

३) सन १९९०-९१ मध्ये पुन्हा जमिनीचे एकत्रीकरण होवुन सदर सर्व्हे नं. १ ते १९ साठी गट क्र. १ ते ४७ असे देण्यात आले सोबत नकाशाची छायांकीत प्रत जोडली आहे. **(प्रपत्र - ३)**

४) दि. ३०/८/१९७६ रोजी विभागीय वन अधिकारी पुणे यांनी जिल्हाधिकारी पुणे यांना महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ अन्वये वन विभागाने ताब्यात घेतलेल्या जमिनीचा गाव व सर्व्हे नुसार मौजे पांगळोली गावासाठी सर्व्हे नं ५५, ५६, ५७, ५३, ५८, ५९, ६१, ६४, ६५ असे दर्शविल्याचे निदर्शनास येते. सोबत छायांकीतप्रत जोडली आहे. **(प्रपत्र - ४)**

५) दि.०८/१२/१९७५ रोजी महाराष्ट्र खाजगी वने संपादन १९७५ अन्वये संपादीत सर्व्हे नं ५५, ५६, ५७, ५९, ५८, ५९, ६१, ६४, ६५ हे पंचनामा करुन ताब्यात घेतल्याचे निदर्शनास येते. सोबत पंचनाम्याची छायांकीतप्रत जोडली आहे. **(प्रपत्र - ५)** प्रत्यक्षात त्यावेळी त्या ठिकाणी पुणे गावासाठी बदललेले सर्व्हे नं १ ते १९ अस्तित्वात होते असे असताना ताबा पंचनाम्यामध्ये जुने सर्व्हे नं प्रमाणे म्हणजेच सर्व्हे नं ५३, ५५,५६, ५७, ५८, ५९, ६१, ६४, व ६५ चा ताबा घेण्यात आला. वनक्षेत्र अथवा विभागीय कार्यालयाकडे प्राप्त प्रकरणी सदर क्षेत्र खाजगी वने, राखीव वने संरक्षित वने यात समाविष्ठ होते किंवा कसे याबाबत वारंवार खाजगी इसम अर्ज देवुन विचारणा करतात. त्यावेळी सदर अर्जासोबत खालील कागदपत्रे आवश्यक म्हणुन अभ्यासली जातात.

माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे.

१. संबंधीत क्षेत्राचा ७/१२ उतारा
२. संबंधीत गावात एकत्रिकरण योजना झाली असल्यास त्याचा स्किम उतारा.
३. दि. ३०/८/१९७५ पासुन संबंधीत क्षेत्राचे ७/१२ उतारे व फेरफार

प्रकरणी वनक्षेत्रपाल शिरोता यांनी तपासणि केली त्याप्रमाणे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. संबंधीत क्षेत्राचा ७/१२ उता-यावर कोणत्याही प्रकारचे वने असल्याची नोंद नाही.
२. स्किम उतारे पहाता गट क्र. १५ साठी सर्व्हे क्र. ४ गट क्र. १३ साठी सर्व्हे क्र. ३ असे दि.३०/८/१९७५ रोजी होते असे निदर्शनास आले त्याप्रमाणे खाजगी वनांचे यादीत सर्व्हे क्र. ३ व ४ नसल्याचे त्यावेळी खात्री केली त्याप्रमाणे सदर क्षेत्र खाजगी वन नसल्याचे निदर्शनास येत असल्याचे खात्री करुन संबंधीतास वृक्षाची लागवड केली आहे याची माहिती दिली होती.

वास्तविकता महाराष्ट्र खाजगी वन अधिनियम १९७५ ची यादी व पंचानाम्यात समाविष्ट असलेले सर्व्हे नं ५५, ५६, ५७, ५३, ५८, ५९, ६१, ६४, ६५, ६, १०, ८५ हे सन १९५७ पुर्वी अस्तित्वात असलेल्या सर्व्हे नं प्रमाणे व क्षेत्राप्रमाणे आहेत. प्रत्याक्षात ताबा घेताना बदललेले सर्व्हे नं १ ते १९ यांच्याप्रमाणे ताबा घेणे आवश्यक होते प्रत्यक्षात तसेच झाले नसल्याने या गोष्टीबाबतची अधिक माहिती सन २००३ च्या या कालावधीत निदर्शनास आली ती खालीलप्रमाणे.

१. वनक्षेत्रपाल शिरोता यांनी २००३ मध्ये सर्व्हे नं १ ते ६९ साठी निश्चित कोणते गट किंवा सर्व्हे नं आहेत या संबंधी भुमी अभिलेख कार्यालय यांना विचारणा केली असता त्यांचेकडे माहिती उपलब्ध होवु शकली नाही. त्यासंबंधी भूमी अभिलेख कार्यालयाने वनक्षेत्रपाल शिरोता यांना सर्व्हे नं १ ते ६९ पासुन सर्व्हे नं १ ते १९ होताना जी योजना होते ती उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे सदर माहिती भूमि अभिलेख कार्यालया अथवा महिसुल विभागाकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी दि. २२/९/२००३ **(प्रपत्र - ६)** व दि. २०/१०/२००५ **(प्रपत्र - ७)** रोजींच्या पत्रांन्वये कळविले आहे.
२. गट क्र. १३ साठी ६१ व गट क्र. १५ साठी ५९ सर्व्हे नं असल्याचे केवळ सदर गावासाठी सन १९५७ पुर्वीचा नकाशा व त्यानंतर १९५७ नंतर ट्रँग्युलेशन पध्दतीने झालेला नकाशा हे केवळ एकमेकावर सुपर इंप्पोज केल्याने स्पष्ट झालेले आहे. ही गोष्ट सन २००४-०५ चे दरम्याने सर्व नकाशे उपलब्ध केल्यानंतर निदर्शनास आली आहे.
३. या वनविभागाचे अभिलेखे विशेषतः कार्यालयीन कामकाजासाठी वनक्षेत्र दाखविण्यासाठी टोपेशिटचा उपयोग केला जातो त्यामुळे अर्जदार यांना माहिती देताना गाव नकाशे वनक्षेत्र कार्यालयात उपलब्ध नसल्याने ही बाब त्यावेळी निदर्शनास आली नाही.

पुणे जिल्हयासाठी शहर विकास आराखडा हा महाराष्ट्र शासनाने मंजुर केलेला असुन त्याप्रमाणे फार्म हाऊस बनविण्याकरीता आवश्यक वृक्ष लागवडीचे प्रमाणपत्र वनविभागाने देणेसंबंधी आहे. त्याप्रमाणे अर्जदार यांना दिलेली आहे. अर्जदाराने जरी अर्जात फार्म हाऊस बंगला, संबंधी उल्लेख केला असला तरी वरील अभिलेख्यातील त्रुटीमुळे वस्तुस्थिती निदर्शनास आली नाही.

अर्जाच्या विषयात झाडे लावल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे असा उल्लेख आहे. फॉर्म हाऊस/बंगला बांधण्याचे काम सुरु करणार आहोत असा उल्लेख असलातरी त्याकरीता परवानगी

मागीतलेली नाही. त्यामुळे कार्यालयातील त्यावेळी उपलब्ध अभिलेख्याची तपासणी करुन व जागेवरील प्रत्यक्ष परिस्थितीनुसार केवळ अस्तित्वात असलेल्या वृक्षाबाबतची सद्यस्थितीची माहिती अर्जदार यांना तत्कालिन उपवनसरंक्षक, पुणे यांनी दिल्याचे दिसुन येत आहे.

या संदर्भात नमुद करण्यात येते की, महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ अन्वये संपादित क्षेत्राच्या नोंदी वनविभागाने दिलेल्या यादीनुसार घेण्याबाबत व सदर क्षेत्रावर वनेत्तर कामे करण्यात येवु नये याबाबत वारंवार महसूल विभागास विनंती करण्यात आलेली आहे तथापी सदर नोंदी ह्या २००५-२००८ या कालावधीत घेतल्याचे दिसुन येते तसेच या विभागातील मावळ तालुक्यातील शिरोता वनक्षेत्रातील मौजे पांगळोली ता. मावळ येथील क्षेत्र हे महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ अन्वये संपादित झालेल्या क्षेत्राच्या नोंदी घेणे बाबत वारंवार कळविले होते सदर गावातील संपादित क्षेत्रावर ऑक्टोबर २००८ मध्ये नोंदी घेतल्याचे दिसुन येते सोबत गट नं. १३ व १५ च्या ७/१२ अभिलेख्याची छायंकित प्रत अवलोकनासाठी जोडली आहे. **(प्रपत्र -८)**

उपरोक्त बाबीवरुन असे नमुद करण्यात येते की, अर्जदार हे वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडून फॉर्म हाऊस बनविण्याकरीता प्रमाणपत्र घेत नसुन त्यांनी लावलेल्या झाडांबाबत वनपरिक्षेत्र कार्यालयाकडे प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे व त्यानुसार त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्याच्या आधारे विभागीय कार्यालयास अहवाल सादर करुन विभागीय कार्यालयाने अर्जदार यांना जागेवर अस्तित्वात असलेल्या झाडांची माहिती दिल्याचे दिसुन येत आहे.

फॉर्म हाऊस/बंगला बनविण्याचे कामाबाबत अर्जात उल्लेख आहे आणि बंगला बनविणे हे वनेतर काम आहे याची जाणीव सर्व वनाधिका-यांना आहे हे उपरोक्त नमुद केलेल्या विवेचनावरुन दिसुन येते. तसेच पुणे वनविभागात गट नं. १३ व १५ चा जुना स.नं. ५९ व ६१ आहे याबाबतचे आवश्यक ते नकाशे व सहपत्र अवलोकनार्थ सोबत सादर केले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी नमुद करण्यात येते की, याबाबत उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.४४/२००९ तसेच सर्वोच्च न्यायालयातही एसएलपी क्र.१०६७७/२००८ सुरु आहे. त्याचप्रमाणे राज्यातील खाजगी वनासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयातील एसएलपी क्र.११३९८/२००८ मध्येही सदर प्रकरण समाविष्ट आहे.

वनसंरक्षक,
**पुणे वनविभाग, पुणे**

माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे.